संफौ.ख.क्रं– २०७/२०२२
शासन वि. बालाजी
निशाणी क्रं.– १०

## सरकार तर्फे साक्षीदार क्रं.०१ यांची जबानी

---

मी याव्दारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की–
**साक्षीदाराचे पूर्ण नांव– दिपक रामराव बुरके**
**वय–** ४५ वर्षे **व्यवसाय–** टेलर
**राहणार–** रा. शिवाजी चौक हदगाव, ता.हदगाव जि. नांदेड

---

**सरतपासणी सरकार तर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्रीमती.बी.ए.लाठकर यांच्या वतीने सुरु**

**१.** मी आरोपीला ओळखत नाही. मला पोलीसांनी दि.३०.०१.२०२२ रोजी जप्तीपंचनामा करण्यासाठी बोलावले नव्हते. माझे समक्ष पोलिसांनी काहीही जप्त केले नाही. आता मला दि. ३०.०१.२०२२ रोजीचा जप्तीपंचनामा दाखविण्यात आला. मला जप्तीपंचनाम्यातील मजकूर माहित नाही. जप्तीपंचनाम्यावरील सही माझी आहे. जप्तीपंचनाम्यावरील माझ्या **सहीस नि.क्रं. पी–१/ पी.डब्ल्यु–१** देण्यात येतो.

**साक्षीदार याने सरकार पक्षास सहकार्य केले नाही त्यामुळे त्यास फितुर घोषीत करण्यात आले. सहा. सरकारी अभियोक्ता यांचे विनंतीवरुन त्यांना भारतीय पुरावा कायद्याचे कलम १५४ अन्वये साक्षीदारास उलटतपासणी दरम्यान सुचक प्रश्न विचारण्यास परवानगी देण्यात आली.**

**२.** आता मला दिनांक ३०.०१.२०२२ रोजीचा जप्तीपंचनाम्यातील अधोरेखांकीत भाग 'अ' वाचून दाखवण्यात आला त्यातील मजकुर खरा नाही. हे म्हणणे खरे नाही की, मला दिनांक ३०.०१.२०२२ रोजी मौ. हदगाव ता. हदगाव जि. नांदेड येथील सोनुले चौक येथे जप्तीपंचनामा करण्यासाठी पोलीसांनी बोलावीले. हे म्हणणे खरे नाही की, त्यादिवशी माझे समक्ष एका पांढ–या रंगाच्या प्लास्टीक कॅनमध्ये १० लिटर गावठी हातभट्टी दारु ज्याची अंदाजे किंमत ५००/– रु असा मुद्देमाल मिळून आला. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीला वाचविण्याकरीता मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**सरतपास पूर्ण.**
**उलटतपास आरोपीतर्फे विधिज्ञ श्री.के.पी.ढोले यांनी नाकारला.**
**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत.

JADHAV SWATI GANPAT
Digitally signed by JADHAV SWATI GANPAT
Date: 2026.08.19 17:31:09 +0530

दि. १९/०८/२०२६

**(श्रीमती.एस.एस.लोहकरे–जाधव)**
२ रे प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी,
ता. हदगांव, जि. नांदेड

**प्रमाणपत्र**

मी अशी खात्री देतो की, सदर पी.डी.एफ. फाईलमधील सर्व मजकुर मुळ न्यायनिर्णयाप्रमाणे / आदेशाप्रमाणे प्रत्येक शब्द बरोबर आहेत.

कनिष्ठ लिपीकाचे नाव – श्री. ओ.बी.पत्रे
न्यायालयाचे नाव – सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर व न्यायदंडाधिकारी वर्ग – १, हदगांव.

| | |
|---|---|
| आदेश दिनांक | :१९.०८.२०२६ |
| पिठासीन अधिकारी यांनी स्वाक्षरी केलेली तारीख | :१९.०८.२०२६ |
| आदेश / न्यायनिर्णय अपलोड केलेली तारीख | :१९ .०८.२०२६ |